**सत्र खटला क्र. ४६/२०२४ मधील फौजदारी जामीन अर्ज**

**शेख साजीद शेख अजीज**

**वि.**

**महाराष्ट्र शासन**

**CNR NO. MHBU20-000700-2024)**

## नि.क्र. २५ खाली आदेश

## (पारीत दिनांक १६ डिसेंबर २०२५)

**०१]** अर्जदार – **शेख साजीद शेख अजीज** याने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८२ अन्वये पोलीस ठाणे, जानेफळ येथील अपराध क्र. २०४/२०२४, कलम ३६४, ३६५, १२०(ब), ३०२ सह कलम ३४ भा.दं.वि. खालील प्रकरणात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला.

**०२]** अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादीचे पती दिलीप इंगळे हा पैशाचा पाऊस पाडत होता. त्यामुळे दिलीप इंगळे आणि अमोल राजपुत यांचे मध्ये काही दिवसांपासून पैशाच्या व्यवहारावरून वाद चालू होता. म्हणून आरोपी अमोल राजपुत याने कट रचून, पूर्व नियोजन करून दिनांक २२.०६.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या सुमारास संदीप उर्फ बाबुराव शेवाळे, योगेश तोंडे, शेख साजिद शेख अजीस यांच्या मदतीने संदीप दातार याची स्वीफ्ट गाडी क्र. एम.एच.–२८–बी.एच. १८२४ या वाहनात फिर्यादीच्या पतीला घातपात करण्याच्या उद्देशाने किंवा जिवे मारण्याच्या उद्देशाने जानेफळ येथून कोपरगाव, जि. अहमदनगर येथे नेले. त्यानंतर या आरोपींनी इतर अज्ञात इसमाच्या सहाय्याने फिर्यादीच्या पतीचे अपहरण घडवून आणल्याचे जबाबात सांगितले. फिर्यादी हिने पोलीस ठाणे, कोपरगाव, जि. अहमदनगर येथे फिर्याद दाखल केली. सदर फिर्याद पोलीस ठाणे, जानेफळ येथे ऑनलाईन पाठवण्यात आली. तपासादरम्यान फिर्यादीच्या पतीची निर्घृण हत्या करण्यात आली असल्याचे निष्पंन्न झाले. त्यामुळे पोलीस ठाणे, जानेफळ येथे अपराध क्र. २०४/२०२४ कलम ३६४,३६५, १२०(ब), ३०२ सह कलम ३४ भा.दं.वि. खाली गुन्हा नोंदवण्यात आला.

**०३]** अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ जावेद शेख यांनी युक्तिवाद केला की,

अर्जदाराचे फिर्यादीत नाव नमूद करण्यात आलेले नाही. अर्जदाराचा या गुन्ह्याशी कोणताही संबध नाही. सुरूवातीची फिर्याद ही मयत दिलीप इंगळे याच्या अपहरणाबाबत दाखल करण्यात आली. या प्रकरणात अनेक साक्षीदारांची बयाणे नोंदवण्यात आली असून अर्जदाराने दिलीप इंगळे याला जिवाने मारले असा आरोप नाही. अर्जदार हा केवळ चालक म्हणून मयत दिलीप इंगळे याच्यासोबत स्विफ्ट गाडी मध्ये शिर्डी पर्यंत गेला होता व तेथून तो परत आला. मुख्य आरोपींकडे घटनेच्या दिवशी ड्रायव्हर नसल्याने अर्जदार हा गाडीचा चालक म्हणून गेला होता. आरोपी योगेश व अर्जदार शेख साजिद शेख अजीस हे मागेच थांबवले. मृतकाला दुसऱ्या ठिकाणी नेऊन इतर आरोपींनी जिवाने मारले. अर्जदाराचा दिलीप इंगळे याला मारण्याचा कोणताही हेतू किंवा उद्देश नव्हता. अर्जदार हा घटनास्थळावर हजर देखील नव्हता. अर्जदार व मृतक शेवटी सोबत जातांना दिसल्याचे काही साक्षीदारांनी सांगितले. परंतु त्याने दिलीप इंगळे याची हत्या केली असे कोणत्याही साक्षीदाराने त्यांच्या बयाणात सांगितले नसल्याने अर्जदाराचे कृत्य हे मर्यादीत आहे. अर्जदाराने गुन्ह्याची माहिती पोलिसांना दिली नसल्याने त्याला या गुन्ह्यात गोवण्यात आले आहे. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदाराच्या अनुषंगाने संपूर्ण तपास होऊन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. परिणामी अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता भासणार नाही. अर्जदाराला जामीन मिळाल्यास अर्जदार कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. म्हणून अर्जदाराला अटकपूर्व जामीन देण्याची विनंती केली. अर्जदाराच्या वतीने खालील प्रकाशीत न्यायनिवाड्यांवर भरोसा ठेवण्यात आला.

[01] **Tejrao Bhaskarrao Patil Vs. The State of Maharashtra**, reported in **DLD (Cri)**–2023–2567.

[02] **Digambar Alias Aditya Raju Sorte Vs. State of Maharashtra**, reported in **AIROnline** 2021 **Bom** 5355.

[03] **Sonali Satish Wakade Vs. State of Maharashtra**, reported in **AIROnline** 2021 **Bom** 333.

**०४]** याउलट, विद्वान सरकारी वकील कु. आर. डी. बावस्कार यांनी दिनांक १२.१२.२०२५ रोजी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर

आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, घटनेच्या दिवशी अर्जदार हा मयत दिलीप इंगळे याच्यासोबत होता. त्यावेळेस बऱ्याच साक्षीदारांनी त्याला मयतासोबत जातांना बघितले. त्यानंतर दिलीप इंगळे याची हत्या करण्यात आली. परिणामी अर्जदार व इतरांविरूद्ध अपहरण, गुन्हेगारी कट रचणे व हत्या करणे अशा गुन्ह्याची नोंद करण्यात आली. सरकारी वकील सांहेबांनी पुढे असा युक्तिवाद केला की, प्रस्तुत प्रकरण हे अपहरण आणि हत्येचे असून परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारीत आहे. अज्ञात आरोपींविरूद्ध तपास हा प्रारंभीक अवस्थेत आहे. मोबाईल आणि बोलेरो जीप जप्त होणे बाकी आहे. अर्जदाराचा या गुन्ह्यात प्रथम दर्शनी सहभाग आहे. तसेच या गुन्ह्यात इतर अज्ञात आरोपींचा देखील समावेश आहे. त्यामुळे अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो तपासात अडथळा निर्माण करू शकतो व फरार/अज्ञात आरोपींची अटक टाळू शकतो. तसेच अर्जदार साक्षीदारांना फितूर करू शकतो. म्हणून अर्जदाराचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०५] वरील युक्तिवादाच्या अनुषंगाने केस पेपरची पाहणी केली असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरण हे अपहरण, हत्येचा कट रचणे आणि हत्या करण्याचे असल्याने गुन्ह्याचे स्वरूप अत्यंत गंभीर आहे. या प्रकरणातील मयत दिलीप इंगळे याची पाईपाच्या सहाय्याने निर्घृण हत्या करण्यात आली आहे. हत्येकरिता षडयंत्र रचण्यात येऊन बऱ्याच आरोपींची मदत घेण्यात आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अमोल राजपुत व इतर ५ ते ६ अज्ञात आरोपी अद्याप पर्यंत फरार आहेत. अर्जदार हा देखील फरार असल्याने त्याचेविरूद्ध फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

०६] अर्जदारातर्फे करण्यात आलेल्या युक्तिवादावरून हे स्पष्ट होते की, त्याने सिफ्ट कारने मयत दिलीप इंगळे याला जानेफळ येथून शिर्डी पर्यंत घेऊन गेला होता. त्यामुळे दिलीप इंगळे याची हत्या होण्यापूर्वी अर्जदार व मयत हे सोबत असल्याचे प्रथम दर्शनी सिद्ध होते. येथे महत्त्वपूर्ण बाब नमूद करणे गरजेचे असे की, या प्रकरणातील मुख्य आरोपी अमोल राजपुत हा अद्याप पर्यंत फरार आहे. दिनांक २२.०६.२०२४ रोजी अर्जदार व मुख्य आरोपी अमोल यांच्यात अनुक्रमे ९७, ३४, १२, ४२, ५३ आणि २७ मिनिटांचा

संवाद झालेला आहे. अर्जदार हा खरोखरच चालक म्हणून गेला असता तर त्याला मुख्य आरोपीशी इतका वेळ संवाद करण्याची गरज पडली नसती. त्यामुळे अर्जदार देखील या गुन्ह्यात प्रथम दर्शनी सहभागी असल्याचे दिसून येते. तसेच अर्जदाराला दिलीप इंगळे याच्या हत्येची माहिती मिळाल्यानंतर देखील त्याने ती माहिती पोलिसांना न देता आज पर्यंत फरार राहिलेला आहे. याशिवाय फिर्यादीचे बयाण व इतर साक्षीदारांच्या बयाणावरून अर्जदार हा मयत दिलीप इंगळे याच्यासोबत गाडीतून जातांना दिसला. या प्रकरणातील अज्ञात आरोपी पकडायचे असल्याने अर्जदार याचा हत्येचा कट रचणे व हत्या करणे अशा गुन्ह्याशी कोणताही संबंध नसल्याचे म्हणणे न्यायोचित ठरत नाही.

०७] या प्रकरणात बुलडाणा, अहमदनगर, शिर्डी, बारामती, कर्जत येथील विवीध व अज्ञात आरोपींचा सहभाग असून गुन्ह्याचे स्वरूप क्लिष्ट आहे. त्यामुळे सर्व आरोपींच्या अटकेनंतर पुराव्याची जुळवा–जुळव होऊन प्रत्येक आरोपीचे कृत्य स्पष्ट होणार आहे. परिणामी अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता भासणार आहे. याशिवाय अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो फरार होऊ शकतो आणि साक्षीदारांवर दबाव आणू शकतो. शिवाय अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो फरार आरोपी व अज्ञात आरोपींना पलायन करण्यास मदत करू शकतो.

०८] याशिवाय अर्जदाराने दाखल केलेले न्यायनिवाडे यातील तथ्य व परिस्थिती आणि प्रस्तुत प्रकरणातील तथ्य व परिस्थिती यामध्ये भिन्नता दिसून येते. **प्रकाशीत न्यायनिवाडा तेजराव** यात आरोपीचा विशेष सहभाग नसल्याने जमानत देण्यात आली. **प्रकाशीत न्यायनिवाडा दिगांबर सोरते** यात आरोपीचे कृत्य, त्याचे १९ वर्षाचे वय व गुन्हेगारी पार्श्वभूमी विचारात घेऊन जमानत देण्यात आली. तर **प्रकाशीत न्यायनिवाडा सोनाली वाकडे** यात दोषारोपपत्र दाखल झाल्याने जमानत देण्यात आली. परंतु प्रस्तुत प्रकरणात अनेक आरोपींचा सहभाग असून अर्जदाराविरूद्ध प्रथम–दर्शनी गुन्हा सिद्ध होत आहे. या प्रकरणात दोषारोपपत्र दाखल केले असले तरीही मुख्य आरोपी व इतर अनेक अज्ञात आरोपी फरार आहेत. म्हणून अर्जदाराला वरील प्रकाशीत न्यायनिवाड्यांचा फायदा मिळत नाही. एकंदरीत अर्जदाराने केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप, गंभीरता, गुन्ह्यासाठी असलेली मृत्यूदंड शिक्षेची तरतूद,

अर्जदाराचे कृत्य आणि तपासाची स्थिती पाहता अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**— आ दे श —**

अटकपूर्व जामीन अर्ज (नि.क्र. २५) नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2025.12.16 17:44:53 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – १६.१२.२०२५**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – १६.१२.२०२५